| MHPU240002212020 | रे.मु.न. २०/२०२० कोडीबा थोरात वि. भरत थोरात व इतर |
|---|---|

## रे.मु.नं. २०/२०२० मधील निशाणी क्र. २७ व २९ वरील संयुक्तीक आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी क्र. २ चे वारस विलास थोरात यांनी वादी क्र. २ महादु गंगराम थोरात हे मयत झाल्याने त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद् होवून त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यास जो विलंब झाला तो माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेले आहेत.

२. अर्जातील कथनानुसार, वादी महादु गंगाराम थोरात हे दि. १६/०४/२०२२ रोजी मयत झाले. त्यामुळे सदर मयत वादीविरुध्द प्रस्तुतचा दावा अबेट झालेला असून सदर वादीचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे मयत वादीचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद् होवून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींतर्फे लेखी खुलासा मागविण्यात आला असता प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनी नि.क्र. ३३ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविला. त्यांच्या म्हणण्यानुसार, वादीचे अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही. वादीने विलंबाची कोणतेही संयुक्तिक कारण नमुद केलेले नाही. वादी क्र. १ व २ हे एकाच कुटुंबातील आहेत. वादी क्र. १ यास दाव्याची पुर्ण माहिती आहे. केवळ प्रतिवादींना त्रास देण्यासाठी वादीने सदरचे अर्ज प्रदिर्घ विलंबानंतर दाखल केलेले आहेत. त्यामुळे सदरचे अर्ज जास्तीत जास्त दंड आकारूण नामंजुर करण्यात यावेत.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, वादींनी प्रस्तुत दावा हा दावामिळकतीचे सरस निरस मानाणे वाटप होवून मिळण्याकरिता व ठरावाकरिता दाखल केलेला आहे. परंतु दाव्याचे कामकाज प्रलंबित

असतांना वादी क्र.२ महादु गंगाराम थोरात हे दि. १६/०४/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. परंतु प्रस्तुत अर्ज हे दि. ०२/०९/२०२४ रोजी दाखल केल्याचे दिसतात. अशा परिस्थितीत, प्रस्तुतचे दिलेले अर्ज व त्याबाबत कायदेशीर बाब पाहता, दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २२ नियम ०३ प्रमाणे मयत वादीचे वारस सदर व्यक्ती मयत झाल्यापासून ९० दिवसांचे आत अर्ज सादर करुन अभिलेखावर घेणे आवश्यक असते. वादीने सदरचा अर्ज दि. ०२/०९/२०२४ रोजी दाखल केलेले दिसतात. वादींनी प्रस्तुतचे अर्ज साधारण दोन वर्षापेक्षा जास्त विलंबाने दाखल केलेले दिसतात. प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनी देखील त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविला आहे. परंतु असे जरी असले तरी, वादी यांनी त्यांचे अर्जातील कथनाचे सत्यतेसाठी वादी क्र. २ अ यांचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. २८, ३० व मयत वादीचे मृत्यूप्रमाणपत्र निशाणी क्र. २६ सोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत, सदर अर्जात नमुद केलेली परिस्थिती व कायदेशीर बाब या सर्व बाबी सारासार न्यायबुध्दीने विचारात घेता सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्याय हक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही. उलटपक्षी, उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. सबब, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन, वादीचे अर्ज मंजुर करणे आवश्यक असलेच्या निष्कर्षाप्रत येवुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचे प्रस्तुत अर्ज निशाणी २७ व २९ मंजुर करण्यात येतात.

२. वादी महादु गंगाराम थोरात हे मयत झाल्याने झालेला अबेटमेंटचा आदेश प्रतिवादी क्र. २ ते ५ यांना एकत्रितपणे रक्कम रुपये १५००/— (रक्कम रुपये एक हजार पाचशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर रदद् करण्यात येतो व त्यांचे कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2025.01.18 13:10:21 +0530

ठिकाण: घोडेगाव
दि.१७.०१.२०२५

**(एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
घोडेगाव

| | |
|---|---|
| MHPU240002212020 | **रे.मु.न. २०/२०२०**<br>**कोडीबा थोरात**<br>**वि.**<br>**भरत थोरात व इतर** |

**<u>रे.मु.नं. २०/२०२० मधील निशाणी क्र. ३१ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुत अर्ज वादी क्र. २ चे वारस विलास थोरात यांनी वादी क्र. २ महादु गंगाराम थोरात हे मयत झाल्याने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ३ प्रमाणे त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथानानुसार, वादी महादु गंगाराम थोरात हे दि. १६/०४/२०२२ रोजी मयत झाल्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे व आवश्यक आहे. वादीचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या हक्क, अधिकारांचे काणेतेही नुकसान होणार नाही. तसेच अर्ज मंजुर केल्यास दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब, दुरुस्ती अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणून दाखल करुन नि.क्र. ३३ वरील जबाब हाच त्यांचे म्हणणे असल्याचे नमुद केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने प्रदिर्घ विलंबानंतर प्रस्तुतचा अर्ज दिला असुन तो कायद्याने चालण्यास पात्र नाही. विलंबाचे कोणतेही संयुक्तिक कारण अर्जाकामी नमुद केलेले नाही. त्यामुळे जास्तीत जास्त दंड आकारून वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुत दावा हा सरसनिरस मानाणे वाटप होवुन मिळण्याकरिता व ठरावाकरिता दाखल केलेला आहे. परंतु दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना वादी महादु गंगाराम थोरात हे दि. १६/०४/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादींनी सदरचा अर्ज दि. ०२/०९/२०२४ रोजी दाखल केलेला दिसतो. वादीने प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला दिसतो. परंतु दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्याकरीता सदर

अर्जाप्रमाणे दुरुस्ती महत्वाची दिसून येते. वादीने त्यांचे अर्जातील सत्यतेकरीता नि.क्र. ३२ वरील वादी क्र. २ चे वारस विलास थोरात यांचे प्रतिज्ञापत्र तसेच निशाणी क्र. २६ सोबत मयत वादी क्र. २ चे मृत्युप्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. सबब, अशा परिस्थितीत त्यांच्या कायदेशीर वारसांना दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ३ प्रमाणे दावा चालविण्याचा अधिकार टिकून रहात असल्याने वादी महादु गंगाराम थोरात यांचे नाव दावे अर्जातून कमी करुन त्यांच्या कायदेशीर वारसांना दाव्यात सामील करुन त्याप्रमाणे दुरुस्ती दावे अर्जात करणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास विरोध दर्शवला आहे. परंतु, प्रस्तुत दावा वाटप व ठरावाकरिता दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीत, सदर दुरूस्ती अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्यायहक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही अथवा दाव्याचे मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. उलटपक्षी, प्रस्तुत दाव्यात सर्व पक्षकारांना सामील करुन घेतल्यास उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी ३१ हा निशाणी क्र. २७ व २९ वर झालेल्या खर्चाचे अटीस अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी सदर अर्जाप्रमाणे १४ दिवसांचे आत अथवा पुढील तारखेपर्यंत दावे अर्जात/सरनाम्यात दुरूस्ती करावी.

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2025.01.18 13:10:29 +0530

ठिकाण: घोडेगाव
दि.१७.०१.२०२५

**(एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
घोडेगाव